डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे ४११००१
barti
दूरध्वनी क्र. ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३० फॅक्स :०२०-२६३३ ३५९६
E-mail: dg@barti.in Website: www.barti.in

# जाहीर आवाहन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या मार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातींच्या सर्व शासकीय योजनांचे बेंचमार्क सर्वेक्षण करण्यात येत आहे. सदर सर्वेक्षण अंतर्गत महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जातीमध्ये समाविष्ट असणाऱ्या ५९ जातींचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक स्थितीची सद्यस्थिती तसेच शासकीय योजनांचा लाभ घेण्याचे प्रमाण, लाभ न घेण्याची कारणे इत्यादी विषयावर संशोधन करण्यात येणार असून धोरणात्मक शिफारशी सह अहवाल शासनास सादर करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्यामध्ये अनुसूचित जातीमधील ५९ जातींचे वास्तव्य आहे. तथापि भारतीय जनगणना-२०११ नुसार अनेक जातींची लोकसंख्या अत्यल्प असल्याचे दिसून येते. सदर सर्वेक्षणात सर्व ५९ जातींचा समावेश होणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी महाराष्ट्र राज्यामध्ये वेगवेगळया परिक्षेत्रात कार्यरत असलेल्या विविध समाजाच्या संस्था, संघटना, अशासकीय संस्था यामधील शिष्टमंडळ यांना आवाहन करण्यात येते कि, त्यांच्याकडे उपलब्ध असलेली समाजाची लोकसंख्या, समाजाचे वास्तव्य असणारे क्षेत्र, कुटुंब यादी तसेच तदअनुषंगिक माहिती बार्टी कार्यालयास कळवावी. कृपया सदर माहिती research@barti.in या ईमेल वर पाठवावी. प्राप्त होणाऱ्या माहितीच्या आधारे अनुसूचित जातीतील सर्व ५९ जातींचे सर्वेक्षण करण्यास उपयुक्त होईल.

विभागप्रमुख
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व
प्रशिक्षण संस्था, पुणे.